IO प्रत.

N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

## FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** औरंगाबाद शहर **P.S.(ठाणे):** एम.आई.डी.सी. सिडको **Year (वर्ष):** 2022
 **FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0261 **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 05/07/2022 20:18 बजे

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. **(a) Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
 1. **Day(दिवस):** मंगलवार **Date From (दिनांक पासून):** 05/07/2022
 **Time Period (कालावधी):** पहर 4 **Date To ( दिनांक पर्यंत):** 05/07/2022
 **Time From (वेळेपासून):** 12:02 बजे
 **Time To (वेळेपर्यंत):** 12:02 बजे

 **(b) Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
 **Date (दिनांक ):** 05/07/2022 **Time (वेळ):** 20:05 बजे

 **(c) General Diary Reference (रोजनामचा संदर्भ**
 **Entry No. (नोंद क्र.):** 027 **Date & Time (दिनांक आणि वेळ):** 05/07/2022 20:09 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
 1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):** पूर्व, 2 किमी
 **Beat No. (बिट क्र.):**

 **(b) Address (पत्ता):** पोलीस स्टेशन सिकलठाणा, ,औरंगाबाद ग्रामिण

 **(c) In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
 **Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
 **District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**
 **(a) Name (नाव):** अभय वसंत महाले
 **(b) Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**
 **(c) Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1979 **(d) Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत
 **(e) UID No. (यु.आय.डी. क्र.):**
 **(f) Passport No.(पारपत्र क्र.):** **Date of Issue (दिल्याची तारीख):**
 **Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**
 **(g) Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)**
 ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No.(अ. | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

 **(h) Address (पत्ता):**

(h) **Address** (पत्ता):

| S.No.(अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पत्ता | मालेगाव नाका, डआंबेडकर चौक, ,बौध्दविहार जवळ, मनमाड, नांदगाव,जि नाशिक ,नाशिक ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पत्ता | मालेगाव नाका, डआंबेडकर चौक, ,बौध्दविहार जवळ, मनमाड, नांदगाव,जि नाशिक ,नाशिक ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.): **Mobile** (मोबाइल नं.): 91-8669111938

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपींचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पत्ता) |
|---|---|---|---|---|
| 1 | दिनकर कचरु थोरे | | | 1. चिकलठाणा पोलीस स्टेशन, ,औरंगाबाद ग्रामीण,औरंगाबाद,एम.आई.डी.सी. सिडको,औरंगाबाद शहर,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. मध्ये)) |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)**-(चोरीस गैलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):

11 **Inquest Report / U.D. case No., if any** (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12 **First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):

फिर्याद दिनांक 05/07/2022मी खालील सही करणार अभय वसंत महाले वय 43 वर्षे, व्यवसाय-ट्रान्सपोर्ट, रा.मालेगाव नाका, ड.आंबेडकर चौक, बौध्दविहार जवळ, मनमाड, ता.नांदगाव जि.नाशिक मो.क्र 8669111938, समक्ष हजर राहुन फिर्याद देतो की, मी दिनांक 04/07/2022 रोजी लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय, औरंगाबाद येथे हजर येवुन पोलीस निरीक्षक श्रीमती रेशमा सौदागर यांचे कक्षात दोन पंचा समक्ष लेखी तक्रार दिली होती ती पुढील प्रमाणे, समक्ष लाचलुचपत प्रतिबंध कार्यालय औरंगाबाद येथे हजर येवुन तक्रार देतो की, मी वरिल ठिकाणी राहत असुन मागिल दहा ते बारा वर्षापासुन पासुन ट्रान्सपोर्ट व्यवसाय करतो त्यावर माझा व माझ्या कुटुंबाचा उदरनिर्वाह चालतो. माझ्याकडे माझ्या मालकीचे 10 पेट्रोल वाहतुक करणारे टँकर आहेत. सदरचे पेट्रोल टँकर हे मनमाड येथुन 1.जालना, 2.धुळे, 3.जळगाव, 4. नाशिक, 5.अहमदनगर या रुटवर चालतात. माझ्या मालकीचे पेट्रोल वाहतुक करणारे टँकर क्रमांक एमएच-18-एए-9504 ने दिनांक 16/06/2022 रोजी अपघात झाल्याचे करणावरुन टकर चालक श्री.अण्णासाहेब आंनदा केरे वय 47 वर्षे, व्यवसाय-ट्रक ड्रायव्हर, रा.नागापुर ता.नांदगाव जि.नाशिक यांचेवर पोलीस स्टेशन चिकलठाणा, औरंगाबाद ग्रामीण येथे गुरनं. 254/2022 कलम 304 (अ), 279, 337, 338 भा.द.वि. व कलम 134/177 मोटारवाहन कायदा प्रमाणे गुन्हा दाखल झाला आहे. गुन्ह्याचे तपासिक अंमलदार सहाय्यक फौजदार श्री.डि.के. थोरे हे आहेत. श्री.थोरे, यांनी सदर गुन्ह्यामध्ये दिनांक 21/06/2022 रोजी माझ्या मालकीचे पेट्रोल वाहतुक करणारे टँकर क्रमांक एमएच-18-एए-9504 हे जप्त केले आहे.मी दिनांक 24/06/2022 रोजी मा.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी साहेब, कोर्ट 10 वे औरंगाबाद यांचे न्यायालयात पो.स्टे.चिकलठाणा येथे गुन्ह्यात जप्त असलेले माझ्या मालकीचे पेट्रोल वाहतुक करणारे टंकर क्रमांक एमएच-18-एए-9504 मला परत मिळावे म्हणुन अर्ज केला होता. ज्यास मा.कोर्टात एम.ए. 1827/2022 असा क्रमांक मिळाला आहे. दिनांक 28/06/2022 रोजी माझ्या एम.ऐ.प्रकरणात मा. कोर्टाने पो.स्टे.चिकलठाणा तपासिक अंमलदारचा यांना से रिपोर्ट बाबत आदेश करुन परस्पर पोलीस स्टेशनला पत्र पाठवले होते. त्यावरुन आम्ही दिनांक 01/07/2022 रोजी पो.स्टे.चिकलठाणा तपासिक अंमलदार श्री. थोरे साहेब यांची समक्ष भेट घेवुन त्यांना से रिपोर्ट देणे बाबत विनंती केली , त्यावेळी श्री. थोरे साहेब यांनी से रिपोर्ट तयार करुन आमच्याकडे दिला व म्हणाले की, गाडी सोडतेवेळी तुम्हाला पोलीस स्टेशन चे मोहरिल विशाल यांच्यासाठी 1000/-रुपये रुपये दयावे लागतील त्यानंतर गाडी सोडण्यात येईल असे बोलुन श्री. थोरे यांनी माझ्याकडे 1000/- रुपये लाचेची मागणी केली आहे. परंतु मला त्यांना लाच देण्याची ईच्छा नसल्याने मी श्री.डि.के. थोरे, यांना नाईलाजाने हो म्हणालो आहे. माझा व सहाय्यक फौजदार श्री.डी.के. थोरे यांचा देण्या घेण्याचा किंवा उसणवारीचा काहीएक व्यवहार नाही. तसेच माझी त्यांचे सोबत काही वैर अगर दुष्मनी नाही. दिनांक 04/07/2022 रोजी माझी गाडी सोडण्या संदर्भात मा.कोर्टाचे आदेश पत्र मला मिळाले आहे. त्यामुळे मी दिनांक 05/07/2022 रोजी श्री. डी. के. थोरे, सहाय्यक फौजदार, व मोहरील विशाल यांची पोलीस स्टेशन

चिकलठाणा यांची भेट घेणार आहे. त्यावेळी श्री.थोरे व मोहरिल श्री.विशाल यांनी पोलीस स्टेशन चिकलठाणा, येथील दाखल गुरनं. 254/2022 कलम 304 (अ), 279, 337, 338 भा.द.वि. व कलम 134/177 मोटारवाहन कायदा मध्ये माझे जप्त असलेले पेट्रोल वाहतुक करणारे टँकर क्रमांक एमएच-18-एए-9504 हे मा.कोर्टाचे आदेशानुसार मला परत करण्यासाठी म्हणुन माझ्याकडे लाचेची मागणी करुन लाचेची रक्कम स्वत: किंवा ईतरा मार्फत स्विकारल्यास त्यांचेवर योग्य ती कायदेशीर कारवाई करावी. अशी तक्रार दिली आहे. माझ्या तक्रारीच्या अनुषंगाने पोलीस निरीक्षक श्रीमती रेशमा सौदागर यांनी बोलविलेले शासकिय पंच क्र. 1 संतोष किसनराव शेळके, पद-मजुर,म.न.पा. उदयान विभाग औरंगाबाद व पंच क्र. 2. साहेबराव सांडु कसारे, पद-शिपाई, जागतिक बँक प्रकल्प विभाग औरंगाबाद असा आमचा ओळख परिचय करुन दिला मि दिलेल्या तक्रारीवर मी पंचानी व पो.नि.श्रीमती रेशमा सौदागर यांनी स्वाक्षरी केल्या. माझ्या अनुषंगाने पो.नि.श्रीमती रेशमा सौदागर यांनी पंच व सर्वानुमते दिनांक 05/07/2022 रोजी पोलीस स्टेशन चिकलठाणा येथील श्री.थोरे साहेब, सहाय्यक फौजदार व श्री. विशाल मोहरील यांची पोलीस स्टेशन चिकलठाणा, येथे जावुन लाच मागणीची पडताळणी करण्याचा निर्णय घेतला. त्यानंतर मी, पो.नि. श्रीमती रेशमा सौदागर, सापळा पथक व शासकिय पंच असे सापळाकामी लागणारे साहित्यासह शासकिय वाहनाने रवाना होवुन पोलीस स्टेशन चिकलठाणाच्या अलीकडे सुरक्षीत ठिकाणी थांबलो. सुरक्षीत ठिकाणाहुन माझ्याकडे व्हाईस रेकार्डर चालु करुन पंच क्र. 1 संतोष किसनराव शेळके, पद-मजुर,म.न.पा. उदयान विभाग औरंगाबाद यांना सोबत घेवुन रवाना केले. चिकलठाणा पोलीस स्टेशन येथे गेल्यानंतर मला समजले की, श्री.विशाल मोहरिल हे कामानिमीत्त बाहेर गेलेले आहेत त्यामुळे मी चिकलठाणा पोलीस स्टेशन समोर श्री. थोरे साहेब, यांना समक्ष भेटलो असता श्री.थोरे साहेब, सहाय्यक फौजदार मला म्हणाले की, तुम्ही मा.कोर्ट आदेश प्रत व बण्ड पेपर दया, आणि एक हजार (1000/-) दयायचे त्याला बघा, त्यावेळी मी त्यांना कोणाला असे विचारले असता ते म्हणाले की, त्याला दयाव लागल ना मोहरिलला, तो गेला ना चावी देवुन इथं असे बोलुन पंचसाक्षीदारा समक्ष माझ्याकडे 1000/- रुपये लाचेची मागणी करुन ते स्विकारण्याचे मान्य केले आहे. सदर लाचेची रक्कम पोलीस स्टेशन चिकलठाणा समोर देण्याचे ठरले. त्यानंतर मी पंचासह सुरक्षीत ठिकाणी परत आलो. त्यानंतर मी सापळा अधिकारी पो.नि.श्रीमती सौदागर यांना सर्व हकिगत सांगितली त्यावरुन सर्वानुमते लगेचच दिनांक 05/7/2022 रोजी पोलीस स्टेशन चिकलठाणा येथे लाचेचा सापळा आयोजीत करण्यात आला. सापळा कारवाईच्या वेळी श्री. डी.के. थोरे साहेब, सहाय्यक फौजदार यांना लाच म्हणुन देण्या करिता मी हजर केलेली 1,000 /- रुपये रक्कम ज्यात 500/-रुपये दराच्या 2 नोटा यांना ऍन्थ्रोसिन पावडर लावुन माझ्या पन्टच्या समोरिल उजव्या बाजुच्या खिश्यात ठेवण्यात आल्या. माझ्याकडे व्हाईस रेकार्डर देवुन मला व पंच क्रमांक क्र.1 श्री.संतोष किसनराव शेळके, पद-मजुर यांचे सह श्री.डी.के.थोरे साहेब, सहाय्यक फौजदार यांचे भेटीकरिता सुरक्षीत ठिकाणावरुन पोलीस स्टेशन चिकलठाणा, औरंगाबाद येथे रवाना केले. त्यावरुन मी पंच साक्षीदार श्री. शेळके यांचे सोबत जाऊन पोलीस स्टेशन चिकलठाणा औरंगाबाद समोर श्री.डी.के. थोरे साहेब, सहाय्यक फौजदार यांना भेटलो व म्हणालो की, हे घ्या तुम्ही मागितल्या प्रमाणे हे 1,000/- हजार रुपये आहे मोजुन घ्या, व माझी गाडी सोडुन दया असे म्हणुन माझ्या पन्टच्या समोरिल उजव्या बाजुच्या खिश्यातुन लाचेची रक्कम 1,000/-रुपये उजव्या हाताने काढुन श्री.डी.के.थोरे साहेब, सहाय्यक फौजदार यांचे समोर धरली असता त्यांनी ती लाचेची रक्कम ठिक आहे असे म्हणुन त्यांच्या उजव्या हाताने स्वत: स्विकारुन त्यांचे स्वत:चे नेसणीस असलेल्या पन्टच्या समोरिल उजव्या बाजुच्या खिश्यात ठेवली. लाचेची रक्कम स्विकारल्यानंतर 12.02 वाजेच्या सुमारास मी सापळा पथकास दिलेल अश्या रितीने पुर्वनियोजीत ईशारा केला असता, सापळा पथकातिल अधिकारी, कर्मचारी व पंच असे घटनास्थळी हजर आले. त्यावेळी पोलीस निरीक्षक श्रीमती रेशमा सौदागर यांनी लोकसेवक सहाय्यक फौजदार श्री.थोरे यांना लाचेच्या रक्कमेसह ताब्यात घेतले त्यांना आपला व सापळा पथकाचा परिचय देवुन त्यांचे नाव विचारले असता त्यांनी त्यांचे नाव दिनकर कचरु थोरे, वय 55 वर्षे, व्यवसाय-नौकरी, पद-सहाय्यक फौजदार, नेमणुक - चिकलठाणा पोलीस स्टेशन, औरंगाबाद ग्रामीण रा. प्लाट नं. 1282, सुधाकरनगर बिड बायपास, औरंगाबाद असे सांगितले. त्यानंतर श्रीमती रेशमा सौदागर सापळा पथक दोन्ही पंच मी व श्री.डी.के.थोरे, सहाय्यक फौजदार असे तेथुन निघुन लाचलुचपत प्रतिबंधक विभाग औरंगाबाद येथे आलो. सदर घटने बाबत सविस्तर पंचनामा करण्यात आला. दिनांक 05/07/2022 रोजी 12.02 वाजेच्या सुमारास पोलीस स्टेशन चिकलठाणा, औरंगाबाद येथे दिनकर कचरु थोरे, वय 55 वर्षे, व्यवसाय-नौकरी, पद-सहाय्यक फौजदार, नेमणुक - चिकलठाणा पोलीस स्टेशन, औरंगाबाद ग्रामीण यांनी पोलीस स्टेशन चिकलठाणा गुरनं. 254/2022 कलम 304 (अ),279,337,338 भादंवि. व कलम 134/177 मध्ये जप्त असलेले माझी मालकीचे पेट्रोल वाहतुक करणारे टँकर क्रमांक एमएच-18-एए-9504 हे मा.कोर्टाचे आदेशानुसार मला परत करण्यासाठी म्हणुन माझ्याकडे 1,000/-रुपये लाचेची मागणी करुन 1000/-रुपये लाच रक्कम पंचसाक्षीदार समक्ष माझ्याकडुन स्वत: श्री.थोरे यांनी स्विकारली आहे. तरी दिनकर कचरु थोरे, वय 55 वर्षे, व्यवसाय-नौकरी, पद-सहाय्यक फौजदार, नेमणुक - चिकलठाणा पोलीस स्टेशन, औरंगाबाद ग्रामीण यांचेवर योग्य ती कायदेशीर कारवाई होणेस विनंती आहे. माझी वरिल फिर्याद माझे सांगणे प्रमाणे माझे समक्ष मराठीत संगणकावर टंकलिखीत करण्यात आली असुन मी वाचुन पाहिली माझ्या सांगण्याप्रमाणे बरोबर व खरी आहे. समक्ष हि फिर्याद दिली सही फिर्यादीने फिर्याद दिल्याने DO अधिकारी मपोउपनि श्रीमती प्रतिभा आबुज यांनी दाखल करुन पुढील तपास पोनि श्रीमती रेशमा सौदागर ने.ला.प्र.वि. औरंगाबाद यांना दिला.

**13.Action Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at**

**(केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरुन अपराध घडल्याचे.)** **or (किंवा)**

**(1) Registered the case and took up the investigation: (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):**

**(2) Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव):** SHIVAJI ARJUN CHAURE

**Rank (पद):** I (Inspector)

**No.(क्र.):** API **to take up the investigation (ला तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

**(3) Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):**

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

**(4) Transferred to P.S.** (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

**14. Signature/Thumb impression of the complainant / informant.** (तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

**15. Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station** (ठाणे प्रभारी अधिका-याची

**Name** (नाव): Vitthal Subhashrao Pote

**Rank**(पद): I (Inspector)

**No.**(सं.): PI